
दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २९३ वा बुधवार दि.०१ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लातूरला विकसित भारताचं केंद्र बनविण्यासाठी साथ द्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन






लातूर/प्रतिनिधी : लातूर येथे उभारण्यात आलेल्या मराठवाडा रेल्वेकोच फॅक्टरीमध्ये वंदे भारत रेल्वे बनणार आहेत. यासाठी लातूरमध्ये अनेक लहान –मोठे उद्योग सुरू होणार आहेत. लातूर हा आत्मनिर्भर भारताचा एक भाग बनणार असून भविष्यात लातूरला विकसित भारताचं केंद्र बनविण्यासाठी भाजपाला साथ द्या, असे आवाहन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. लातूरचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठीही राज्य सरकारच्या माध्यमातून प्रयत्न झालेलेच आहेत. आघाडी सरकारने त्या योजना गुंडाळून ठेवल्या होत्या. परंतु आता नव्याने योजनांना गती देवून लवकरात लवकर लातूरसह मराठवाड्याचा पाणीप्रश्न सोडविण्याची ग्वाही त्यांनी दिली. शैक्षणिक हब असणार्या लातूर येथे मोठे शैक्षणिक केंद्र उभारण्याचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित जनतेला दिला.लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी मंगळवारी दुपारी लातूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भव्य जनआशीर्वाद सभा संपन्न झाली. या सभेस राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिपाइंचे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, खा. अजित गोपछडे, उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, माजी खा. रुपाताई पाटील निलंगेकर, राज्याचे मंत्री ना. संजय बनसोडे, लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. बाबासाहेब पाटील, लोकसभा प्रभारी प्रा. किरण पाटील, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, सुधाकर भालेराव, गोविंद केंद्रे, बब्रुवान खंदाडे यांच्यासह प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, लातूर विधानसभा प्रभारी गुरुनाथ मगे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, शहर जिल्हाध्यक्षा रागिनी यादव, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी माने, संजय दोरवे, शैलेश लाहोटी, अयोध्या केंद्रे, ॲड. जयश्री पाटील आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी मराठीतून सुरूवात केली. शैक्षणिक क्षेत्रात लातूरचे नाव गाजवणार्या लातुरकरांना माझा नमस्कार असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडताच उपस्थित जनसमुदायाने मोदी– मोदी नावाचा गजर सुरू केला. पंतप्रधान म्हणाले की, मागील दहा वर्षात देशात विविध विकास योजना राबवितानाच लातूरसाठी रेल्वे कोच कारखाना सुरू केला. या कारखान्यात वंदे भारत रेल्वे तयार होणार आहेत. विशेष म्हणजे लातूरात तयार झालेले कोच विदेशातही जाणार आहेत. या अनुषंगाने लातूर येथे अनेक उद्योग सुरू होणार आहेत. देशाला आत्मनिर्भर बनविताना लातूर हा त्यातील मुख्य भाग असणार आहे. त्यात लातुरच्या तरुणांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे. यातूनच विकसित भारताचे केंद्र म्हणून लातूर उदयास येणार असल्याचे सांगतानाच भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवर जोरदार टीका केली. त्या पक्षाने कधीही जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. उलट समस्यांचे भांडवल करत त्या माध्यमातून मतदान मिळविण्यासाठी काँग्रेस कार्यरत राहिली. काँग्रेसच्या शाही परिवाराने आपल्या वारसांसाठी पैसा, जमिनी व संपत्तीची लयलूट केली. या पक्षाने देशाला काय दिले ? असा प्रश्न उपस्थित करून शाही परिवाराने देशाला फक्त गरिबी दिली असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.या निवडणुकीत विरोधकांनी आघाडी केली आहे. परंतु त्यांच्याकडे नेता नाही. त्यामुळे पंतप्रधानपद एक–एक वर्षासाठी वाटून घेण्याचा निर्णय आघाडीतील नेत्यांनी घेतला आहे. विरोधी आघाडीने आलटून पालटून देशाला लुटण्याची योजना तयार केली असल्याचे मोदी म्हणाले. अशा सरकारला संधी देणार का ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ही निवडणूक केवळ खासदार निवडण्यासाठी नाही तर देशाला विकासाकडे नेणारी निवडणूक आहे. दहा वर्षांपूर्वी दररोज नव–नवे घोटाळे उघडकीस येत होते. आज दररोज विविध विकास योजनांची चर्चा होत आहे. जागतिक पातळीवर भारताचा दबदबा वाढला असून आपल्या देशाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाचीही हिम्मत नाही. भारत आज घरात घुसून मारतो हे जगाने पाहिले आहे. जगात भारतीय अर्थव्यवस्था सर्वाधिक वेगाने वाढत आहे. दहा वर्षांपूर्वी आपण सर्वांनी आम्हाला निवडून दिले. त्यामुळेच विकासाची ही गती दिसून येत आहे. देशाला लुटणारे आज जेलमध्ये आहेत, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.मोदी यांनी सांगितले की, देशातील तरुणांकडे प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांच्याकडे स्वप्नंही आहेत परंतु, काँग्रेसने तरुणांची स्वप्ने उध्द्वस्त करत एकाच परिवाराचा विचार केला. आम्ही देशाला आमचा परिवार मानतो. या अनुषंगाने आम्ही काम करीत आहोत. देशातील नागरिकांमध्ये आज निर्माण झालेला आत्मविश्वासच विकसित भारताकडे घेवून जाणार आहे. काँग्रेसने आरक्षण हटविण्यासाठी काम केले. परंतु, संविधानात बदल करणे कोणालाही शक्य होणार नाही. काँग्रेसने अनुसूचित जाती व जमाती, इतर मागासवर्गातील नेतृत्व मोठे होऊ दिले नाही. आमच्या सरकारमध्ये ६० टक्क्याहून अधिक मंत्री या प्रवर्गातील आहेत, असेही त्यांनी सांगितले.मागील दहा वर्षात सरकार विकासासाठी कटिबध्द आहे. जनतेला मोफत अन्नधान्य, आरोग्य सुविधा व हक्काचे घर ही मोदींची गॅरंटी आहे. आपण दोन वेळा आमच्या सरकारला जनादेश दिला. त्याचा वापर आम्ही जनहितासाठीच केला. महिला आरक्षण आमच्याच सरकारने दिले. सामाजिक न्यायाला ताकद देणारे सरकार आम्ही चालवले. काँग्रेस व समस्या ही जुळी भावंडे असल्याचेही मोदी म्हणाले.लातूरचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने मराठवाडा वॉटर ग्रीड योजना लागू केली होती. परंतु नंतर आलेल्या आघाडी सरकारने ही योजना गुंडाळली. आता शिंदे सरकारने वॉटर ग्रीडसह जलयुक्त शिवार योजना पुन्हा लागू केली आहे. या माध्यमातून लातूरचा पाणीप्रश्न सोडवू असे मोदी म्हणाले. देशातील जनतेला सरकारकडून मोठ्या अपेक्षा आहेत. अनेक स्वप्न नागरिकांनी पाहिली आहेत. जनतेची स्वप्न पूर्ण करणे हाच मोदींचा संकल्प असल्याचेही मोदी यांनी शेवटी सांगितले.तत्पूर्वी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, काँग्रेसने देशात भ्रष्टाचाराचा पॅटर्न तयार केला होता. परंतु, भाजपाच्या नेतृत्वातील सरकारने विकासाचा नवा पॅटर्न सेट केला आहे. महायुतीकडे शिक्षणावर चर्चा होते तर आघाडी मतांचे राजकारण करते. युतीकडे महामार्गांचे जाळे आहे तर आघाडीकडे रस्त्यांवर फिरूनही लाँच न होणारा युवराज असल्याची टीका मुख्यमंत्र्यांनी केली. पंतप्रधान मोदी यांनी देशातील गरिबी हटवली. दुष्काळ मुक्तीसाठी योजना राबविल्याचेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विरोधकांकडे नेता, नीती व नियतही नाही. ते देश चालवू शकत नाहीत. त्यांची गाडी विना डब्यांची आहे. सध्या निवडणूकांची आचार संहिता आहे. निवडणुका संपताच शेतकर्यांना सोयाबीन भावांतराचे पैसे देण्याचा निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आ. संभाजी पाटील यांनी केलेल्या मागणीस प्रतिसाद देताना मोदी यांनी तिसर्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर केंद्रीय विद्यापीठाची मागणी घेवून आपण त्यांच्याकडे जावू असे आश्वासनही फडणवीस यांनी दिले.लोकसभा संयोजक आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी काँग्रेसकडून विषारी राजकारण केले जात असल्याचे सांगितले. काँग्रेसच्या कर्तृत्वामुळे लातूरला रेल्वेने पाणी आणावे लागले. मात्र मोदी सरकारने रेल्वे तयार करण्याचा कारखानाच लातूरला दिला. लातुरकर पाण्यासाठी मतदान करणार आहेत. त्यामुळे लातूरसाठी केंद्र सरकारने स्थायी पाणी योजना द्यावी. शैक्षणिक क्षेत्रातील लातूरचा इतिहास पाहता लातूरला केंद्रीय विद्यापीठ व आयआयटी सारख्या संस्था द्याव्यात अशी मागणीही आ. निलंगेकर यांनी केली.प्रारंभी प्रा. जोगेंद्र कवाडे, खा. अजित गोपछडे, ना. संजय बनसोडे, उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, आ. बाबासाहेब पाटील, माजी आमदार गोविंद केंद्रे, गणेश हाके, संजय दोरवे यांनीही मनोगत व्यक्त केले. या सभेचे सूत्रसंचलन शैलेश गोजमगुंडे व प्रेरणा होनराव यांनी केले.रेकॉर्डब्रेक गर्दी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ऐकण्यासाठी मतदारसंघातून मोठ्या संख्येने नागरिक लातूर येथे आले होते. उपस्थितांच्या गर्दीने मंडपातील जागाही अपुरी पडली. उपस्थितांना उन्हाचा त्रास होवू नये याची काळजी संयोजकांच्या वतीने घेण्यात आली होती. पिण्याच्या पाण्याची सोयही करण्यात आली होती. मंडपात जागा नसल्याने अनेकांना बाहेर उभे राहूनच आयोजकांनी लावलेल्या पडद्यांवर मोदींचे भाषण ऐकावे लागले. गत काही दिवसांपासून वातावरणात बदल होवून प्रचंड उष्णता निर्माण झालेली आहे. मंगळवारीही रखरखते ऊन असताना मोदींचे विचार ऐकण्यासाठी लाखोंचा जनसागर उसळलेला पाहण्यास मिळाला.मोदी की सोच... आपल्या भाषणात मोदी यांनी २०३६ मध्ये आपल्या देशात ऑलिम्पिक स्पर्धा भरवणे हे माझे स्वप्न असल्याचे सांगितले. तसेच यापूर्वी म्हणजेच २०२९ ला युवा ऑलिंम्पिक स्पर्धा पार पाडण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले असल्याचे स्पष्ट केले. मी कधीही छोटा विचार करीत नाही. देवाने मला घडविताना अशी कुठलीतरी चिप बसवली असल्याने मी छोटा विचार करूच शकत नाही. नेहमीच मोठा विचार करतो, असेही मोदी म्हणाले.युवकांचा उत्साह सभेसाठी जिल्हाभरातून आलेले युवक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. सकाळपासूनच सभास्थळाकडे युवकांचे लोंढे जात होते. मोदी यांनी युवकांशी विशेष संवाद साधताच उपस्थित युवकांनी मोदी नावाचा गजर करत सभागृह दणानून सोडले. पहिल्यांदाच मतदान करणार्या युवकांची संख्या यात लक्षणीय होती. यावरून युवकांमध्ये मोदी नावाचे गारूड किती लोकप्रिय आहे याचा साक्षात्कार झाला.

## महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचा लातूर ग्रामीण दौरा

लातूर दि.३०-०४-२०२४ विरोधकांनी जे सत्तर वर्षात केले नाही. ती विकासकामे दहा वर्षात पूर्ण करून विकासाचा ऐतिहासिक पॅटर्न निर्माण केला. त्या सर्व विकास कामाची माहिती जनसामान्यापर्यंत पोहचावी यासाठी भाजपा नेते तथा किसाना मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी, शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गट, रिपाई आठवले गट, रासप व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघामध्ये ३ मे ते ५ मे २०२४ या कालावधीत लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध ठिकाणी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.महायुती उमेदवाराच्या प्रचार दौर्यामध्ये ३ मे रोजी २०२४ रोजी सकाळी ८.०० वा कव्हा, ९.३० वा सिकंदरपूर, सायंकाळी ६.३० वा.ममदापूर, रात्री ८.०० वा महापूर या ठिकाणी महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. ०४ मे २०२४ रोजी सकाळी ८.०० वा हरंगुळ(खुर्द), सकाळी ९.३० वा.एकूर्गा, सायंकाळी ६.३० वा गोंदेगाव, रात्री ८.०० वा तांदुळजा या ठिकाणी बैठका घेण्यात येणार आहे तर ५ मे २०२४ रोजी सकाळी ८.०० वा.रेणापूर तालुक्यातील बिटरगाव व सकाळी ९.३० वा रेणापूर येथे व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.या प्रचार बैठकीच्या माध्यमातून भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केलेल्या विविध विकास कामाची व विविध योजनेची माहिती सर्वसामान्य नागरिक व मतदारापर्यंत पोहचवली जाणार आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकांना भाजपा व मित्र पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.



## भाजपाच्या भूलथापांना बळी पडू नका पाखरसांगवी येथील महिला मेळाव्यात वैशालीताई देशमुख यांचे आवाहन

लातूर : प्रतिनिधी जनसामान्यांशी नाळ तुटलेल्या भाजपाला काहींही करुन फक्त निवडणुक जिंकायची आहे. त्यामुळेच भाजपाचे नेते भूलथापा मारुन मतदान मागत आहेत. कामावर मत मागण्याऐवजी जाती–धर्माचे मुद्दे पुढे करुन सामान्य नागरीक, महिलांची दिशाभूल केली जात आहे. महिला भगिणींनी भाजपाच्या भूलथापांना बळी न पडता काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा प्रचंड बहुमतांनी विजयी करावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील पाखरसांगवी येथील तात्यासाहेब देशमुख यांच्या निवासस्थानी दि. ३० एप्रिल रोजी सकाळी आयोजित महिला मेळाव्यात श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख बोलत होत्या. यावेळी सुनिता अरळीकर, डॉ. सारीका देशमुख, सीमा क्षीरसागर, दैवशाला राजमाने,तात्यासाहेब देशमुख, अक्षय देशमुख यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना वैशालीताई देशमुख म्हणाले, काँग्रेस पक्षाने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी दिवसरात्र कठोर परिश्रम घेतले. देशासाठी काँग्रेस पक्षाने प्राणाची आहुती दिली. सर्व सामान्य माणुस केंद्रबिंदू माणुन काँग्रेस पक्षाने देशाचा विकास केला त्यामुळेच आज आपला देश सुपर पॉवर ठरत आहे. या उलट भाजपाने देशाच्या जडणघडणीत काहींही योगदान दिलेले नाही. त्यांना फक्त सत्ता हवी आहे. लोकशाही मार्गाने सत्तेवर बसून हुकूमशाही पद्धतीने वर्तणुक केली जात आहे. भाजपाला वेळीच धडा शिकविण्याची गरज असून त्यासाठी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवजी काळगे यांचा प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन केले. या महिला मेळाव्यात सुनीता अरळीकर, दैवशाला राजमाने, राम चामे यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन राम चामे यांनी केले. यावेळी राणाबाई सिंगन, विडाबाई सिंगन, अज्ञानबाई देशमुख, मिनाताई सूर्यवंशी, पुष्पा लखादिवे, रंजना सूर्यवंशी, कांताबाई सिंगन, शालूबाई सूर्यवंशी, महानंदा बोयणे, गोजरबाई जाधव, दैवशाला सुनापे, शुभांगी देशमुख, सुनंदा देशमुख, जयमाला देशमुख, रंजना देशमुख, मिना देशमुख, कौसाबाई गुंडेबोयने, सोमाबाई येरंडे, नाना देशमुख, सतीश सिंगन, रामेश्वर लखादिवे, लिंगप्पा कापसे, जावेद पठाण, सतीश लखादिवे, वजीर शेख, काकासाहेब देशमुख, राम वाघमारे, काशिनाथ बेलूरकर, सुभाष सिंगन यांची उपस्थिती होती.





## संपादकीय....

# गोंधळात गोंधळ

निवडणुकांचे दोन टप्पे पार पडून तिसर्या टप्प्यामधील प्रचार टिपेला पोहोचलेला आहे. ज्या दोन टप्प्यांमध्ये मतदान झाले, तेथील मतदारांची अवस्थासुद्धा मती कुंठीत व्हावी अशी आहे. पायलीचे पन्नास पक्ष आणि त्यांच्याबरोबर प्रचंड संख्येने असलेले बंडखोर आणि अपक्ष यांनी निवडणुकीच्या रणधुमाळीत एवढा गदारोळ उडविला आहे की, जनतेलाही काही समजेनासे झाले आहे. ऊन लागून अचानक चक्कर आल्यानंतर माणूस जसा गपकन खाली बसतो, तशी जनतेची अवस्था झाली आहे.पूर्वी ढोबळमानाने काँग्रेस म्हणजे पंजा, भाजप म्हणजे कमळ, राष्ट्रवादी म्हणजे घड्याळ आणि शिवसेना म्हणजे धनुष्यबाण अशी चिन्हे असत. मतदाराला त्यामधून निवड करणे सोपे जात असे आणि तो मनाशी खूणगाठ बांधून त्याप्रमाणे मतदान करत असे. आता तसे राहिले नाही. राष्ट्रवादी फुटून एका गटाला तुतारी हे चिन्ह मिळाले आहे. नुसते तुतारी म्हटले तर समजण्यासारखे होते; परंतु तुतारी फुंकणारा माणूस हे ते खरे चिन्ह आहे. शिवसेनेमधील पक्ष फुटीनंतर उर्वरित गटाला मशाल हे चिन्ह मिळाले आहे. चित्र रंगीत असेल तर मशाल पेटलेली दिसते; परंतु शुभ्रधवल म्हणजे 'ब्लॅक अँड व्हाईट' असेल तर ते आईस्क्रीमच्या कोनसारखे दिसते. ही झाली प्रमुख पक्षांची चिन्हे. अपक्षांना मिळालेली चिन्हे मात्र मतदारांपर्यंत पोहोचविणे खरोखर कठीण बाब आहे. चिन्हांची ऑफर ठेवताना निवडणूक आयोग जनतेच्या रोजच्या वापरातील वस्तू चिन्ह म्हणून उपलब्ध करून देत असते. जसे की प्रेशर कुकर, शिट्टी, क्रिकेटची बॅट, पतंग, म्हणजे जेणेकरून जनतेला या चिन्हांची ओळख लवकर पटावी, अशी अपेक्षा आहे. नुकत्याच पार पडलेल्या परभणी लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार हे उर्वरित गटाकडून मशाल या चिन्हावर लढत होते आणि त्यांच्या विरोधात असणारे रासपचे उमेदवार हे शिट्टी या चिन्हावर लढत होते. मशाली वाटणे सोपे नव्हते.तरीही स्वर्गीय कवी सुरेश भट यांची रचना असलेले आणि आशा भोसले यांनी गायिलेले गाणे मशालवाल्यांनी आपल्या रिक्षांच्या भोंग्यांवर भरपूर वाजवले. 'उषःकाल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली' आता मशाल विझते की पेटते आणि उषःकाल कोणाचा होतो आणि काळरात्र कोणाची येते हेसुद्धा निवडणुकीच्या निकालानंतरच समजणार आहे. शिट्टी वाटणे मात्र सोपे होते. सांगली लोकसभा मतदारसंघातील अपक्ष बंडखोर यांना लिफाफा हे चिन्ह मिळाले आहे. सगळ्यात सोपे म्हणजे आपल्या सगळ्या मतदारांना छापील लिफाफा देऊन आपले चिन्ह पोहोचविता येऊ शकते.इतर चिन्हांत प्रेशर कुकर हे बर्यापैकी लोकप्रिय चिन्ह आहे. हे चिन्ह निवडताना अपक्ष उमेदवार काही एक विचार करत असावेत. घर म्हटल्यानंतर स्वयंपाकघर आले व स्वयंपाक आला. अर्थात, कुकर आलाच. बाकी पतंग हा भरारी मारण्यासाठी प्रसिद्ध असतो. अपक्षांचा पतंग भरारी मारतो की खाली येऊन कोसळतो, हे निकालानंतरच कळणार आहे. पतंग चिन्ह असणार्या अपक्षांच्या रिक्षांच्या भोंग्यांवर 'चली चली रे पतंग मेरी चली रे' हे गाणे वाजत आहे. विविध चिन्हांमुळे राज्यात, देशात गोंधळात गोंधळ निर्माण झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# कांद्याची जुमलेबाजी !

कांद्यावर लादण्यात आलेल्या निर्यातबंदीने सरकारला ऐन निवडणुकीत शेतक–यांच्या रोषाला सामोरे जावे लागते आहे त्यामुळे भाजप व मित्रपक्षांच्या उमेदवारांची पळता भुई थोडी होतेय. त्यातच गुजरातच्या पांढ–या कांद्यास निर्यातीची मंजुरी दिली जाते आणि कांदा उत्पादकांच्या जखमेवर अक्षरशः मीठ चोळले जाते. साहजिकच राज्यातील शेतक–यांच्या संतापाचा उद्रेक होतोय. विरोधकही गुजरातला झुकते माप दिल्याचे भांडवल करून भाजपची कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू करतात आणि साहजिकच ऐन निवडणुकीत वातावरण तापते. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यावर मग राज्यातील नेत्यांची युद्धपातळीवर धावाधाव सुरू होते आणि मग भांबावलेल्या स्थितीत सहा देशांमध्ये एक लाख टन कांदा निर्यातीस परवानगी दिल्याचे पत्रक सरकार काढते मात्र, प्रत्यक्षात निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने सरकारने नव्याने कांदा निर्यातीस परवानगी दिलेलीच नसते तर मित्र देशांना पाठवायच्या जुन्याच कांद्याचा तो एकत्रित आकडा असतो जो नव्याने प्रसिद्ध करून शेतक–यांना संभ्रमात टाकून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न झालेला असतो मात्र, सत्ताधारी घटक या पत्रकाचा सोयीस्कर अर्थ लावून निर्यातबंदी उठवल्याचे ढोल बडवायला सुरुवात करतात आणि त्यामुळेच माध्यमांमध्येही कांदा निर्यातबंदी उठवल्याचे व सरकारने शेतक–यांना मोठा दिलासा दिल्याचे मथळे येतात.प्रत्यक्षात या सरकारी पत्रकाची शहानिशा केल्यावर असे लक्षात येते की, जुनाच निर्णय पुन्हा नव्याने सांगून शेतक–यांची दिशाभूल करणारी ही निव्वळ बनवाबनवी आहे. सत्ताधारी भाजपच्या जुमलेबाजीच्या गुणाचा हा ढळढळीत पुरावा त्यामुळे साहजिकच शेतक–यांची घोर निराशा झाली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये कांदा निर्यातीवर घालण्यात आलेल्या तिस–या निर्यातबंदीची मुदत मार्च महिन्यात तिला अनिश्चित काळासाठी वाढविण्यात आली. त्यावरून संतापलेल्या शेतक–यांनी कांद्याची खरेदी–विक्रीच बंद पाडल्यावर शेतक–यांचा संताप कमी करण्यासाठी मार्चअखेरीस पाच लाख टन कांदा खरेदी करण्याची घोषणा सरकारने केली होती व त्या वेळीही सत्ताधा–यांनी सरकाने कांदा उत्पादकांचे हित जपल्याचे ढोल जोरजोरात बडवले होते मात्र तेव्हापासून आजवर प्रत्यक्षात काही हजार टनांची कांदा खरेदी झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. थोडक्यात सरकार कांदा उत्पादक असो की शेतकरी त्यांना प्रत्यक्ष दिलासा देण्याऐवजी त्यांची फसवणूक करण्याचाच प्रयत्न करताना दिसते आहे. ही जुमलेबाजी का? शेतकरी या देशाचे मतदार नाहीत का? असे प्रश्न या घटनाक्रमातून निर्माण होतात. त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यावर हे लक्षात येते की, सरकारमध्ये बसलेल्यांना सगळे कळते; पण वळत नाही. कारण सत्ताकारणाच्या राजकारणात शहरी मध्यमवर्गीयांच्या एकगठ्ठा मतपेढीची सरकारला जास्त चिंता आहे. ती असण्याला आक्षेपही नाही कारण देशातल्या सर्वच नागरिकांना रास्त दरात सर्व धान्य, डाळी, तेल, भाज्या आदी जीवनावश्यक बाबी मिळाल्या पाहिजेत. महागाईवर नियंत्रण ठेवले गेले पाहिजे यासाठी प्रयत्न करणे सरकारचे कर्तव्यच! मात्र, हे कर्तव्य पार पाडताना उत्पादकांच्या पोटावर पाय देणे वा त्यांचा खिसा कापणे याला सरकारची न्यायबुद्धी म्हणायचे का? मात्र, हे सरकार सत्तेवर आल्यापासून शेतमाल, भाजीपाला, टोमॅटो, कांदा वगैरेच्या बाबतीत असो की साखर निर्यात, इथेनॉल निर्मितीबाबत असो धोरणांमध्ये सातत्याने धरसोडच पहायला मिळते आहे. कांद्याच्या दराच्या धसक्यातून तर भाजप अद्याप सावरलेलाच दिसत नाही त्यामुळे मोदी सरकार एकीकडे शेतक–यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या घोषणा करते मात्र प्रत्यक्षात निर्यातबंदीचे अस्त्र सतत परजत ठेवते, असाच अनुभव देशातील शेतक–यांना मागच्या पाच वर्षांमध्ये सातत्याने आला आहे. त्यात सर्वांत जास्त



फटका अर्थात कांदा उत्पादकांना बसला आहे. सरकारने मागच्या पाच वर्षात कांद्यावर तिनदा निर्यातबंदी घातली, दोनदा किमान निर्यातमूल्य वाढवून निर्यात मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. एकदा निर्यातीवर शुल्क आकारणी केली आणि अशा विविध प्रयत्नांमधून कांद्याचे दर कुंपणातच रोखण्याचा यशस्वी फंडा पार पाडला. पाच वर्षांमध्ये कांद्यावर घालण्यात आलेली पहिली निर्यातबंदी साडेपाच महिन्यांची, दुसरी साडेतीन महिन्यांची होती. आता तिस–या निर्यातबंदीच्या मार्च महिन्यात संपलेल्या तीन महिन्यांच्या मुदतीला लोकसभा निवडणूक लक्षात घेऊन अनिश्चित मुदतवाढ देण्यात आली आहे.कांदा उत्पादकांचा वा शेतक–यांचा रोष वाढला की, हे सरकार शेतक–यांना मदतीचा हात म्हणून सरकारतर्फे खरेदीची घोषणा करते. प्रत्यक्षात किती खरेदी होते व शेतक–यांना किती दिलासा मिळतो हा संशोधनाचाच विषय! त्यातही सरकारतर्फे खरेदी करणा–या नाफेड असो वा अन्य सरकारी यंत्रणांनी थेट शेतक–यांकडून खरेदी केली तरच त्याचा लाभ शेतक–यांच्या पदरात पडतो मात्र, तेही होताना दिसत नाही. उलट अशा खरेदीत व्यापारीच उखळ पांढरे करून घेताना दिसतात. सरकारने जाहीर केलेल्या उद्दिष्टानुसार खरेदी केली जाते का? याची कधी पारदर्शक तपासणी होत नाही की अशा खरेदीचे आकडे कधी पारदर्शकपणे जाहीर केले जात नाहीत. शेतमाल निर्यातीबाबतच्या धोरणात सातत्याने होत असलेल्या या धरसोडीमुळे देशांतर्गत पुरवठा साखळीत विस्कळीतपणा येतो. त्याचा लाभ व्यापारी उचलतात. म्हणजे ज्या सामान्यांसाठी सरकार ही निर्यातबंदी वगैरे लागू करते त्या सामान्याला चढ्या दरानेच कांदा वा टोमॅटो किंवा इतर अन्नधान्य खरेदी करावे लागते शिवाय धरसोडीच्या या धोरणामुळे आपण परदेशातील आपली हक्काची बाजारपेठही गमावत आहोत मात्र, सरकार याचा साकल्याने विचार करताना अजिबात दिसत नाही.केवळ सत्ताकारणाची समीकरणेच डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेण्याची सरकारला सवय लागली आहे. असो! कांदा निर्यातीवरून उठलेले वादळ लोकसभेच्या नाशिक, धुळे, दिंडोरी, अहमदनगर वगैरे कांदा उत्पादनात अग्रेसर असणा–या भागात सरकारसाठी प्रतिकूल वातावरण निर्माण करणार असल्याचे लक्षात आल्याने सरकारने अंशतः निर्यातीचे जुनेच 'गाजर' पुन्हा नव्याने दाखविण्याची जुमलेबाजी केली आहे मात्र, शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी सरकारची ही जुमलेबाजी उघडी पाडली आहे त्यामुळे कांदा या निवडणुकीत कोणाला हसविणार व कोणाला रडविणार हे ४ जूनला कळेलच, हे मात्र निश्चित!

# महाराष्ट्राची तंत्रभरारी

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला यंदा ६४ वर्षे पूर्ण होत आहेत. पासष्ठीत पदार्पण करणा–या महाराष्ट्राने या संपूर्ण वाटचालीमध्ये देशाला केवळ दिशा दाखवण्याचीच नव्हे तर आधार देण्याची भूमिका वेळोवेळी बजावली आहे. आज भारतात जी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती झाली आहे त्यात महाराष्ट्राचे योगदान मोलाचे आहे. सॉफ्टवेअर निर्यातीच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात कर्नाटकनंतर दुसरा क्रमांक आहे. महाराष्ट्रात स्टार्ट अप योजनांना चांगला प्रतिसाद मिळत असून आता अधिकाधिक युवा वर्ग स्टार्ट अपकडे वळत आहे. येत्या काळात बाजारपेठेची मागणी लक्षात घेऊन त्यांच्या उन्नतीसाठी आर्टिफिशियल इंटेलिजेंस, बिग डेटा अॅनालिसिस, रोबोटिक्ससारख्या क्षेत्रातील कौशल्य प्रदान करणे आवश्यक आहे.धुनिक काळात अर्थव्यवस्थेचा बव्हंशी विकास हा विज्ञान–तंत्रज्ञानाच्या विकासावर आधारित असतो. महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा आजच्या काळात दिसणा–या तंत्रज्ञानाचा उगमही झालेला नव्हता मात्र तरीही महाराष्ट्राची उभारणी करणा–या नेतृत्त्वाने, इथल्या जिज्ञासूंनी, समाजासाठी धडपडणा–यांनी, प्रतिभावंतांनी आणि तंत्रज्ञांनी आपापल्या परीने योगदान देत, पाठपुरावा करत नवनवीन तंत्रज्ञानाने महाराष्ट्राला समृद्ध करण्याचे काम केले. परिणामी आज भारतात जी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातली क्रांती झाली आहे त्यात महाराष्ट्राचे योगदान महत्त्वाचे दिसून येते. देशाच्या माहिती तंत्रज्ञानातल्या एकूण उत्पन्नापैकी महाराष्ट्राचे योगदान २० टक्क्यांहून अधिक आहे. पुण्यासारख्या शहराची एके काळी जी 'विद्येचे माहेरघर' अशी ओळख होती ती आता माहिती तंत्रज्ञानातले एक प्रमुख शहर म्हणूनही ओळख आहे. केवळ पुणेच नव्हे तर गेल्या दशकभराच्या काळात नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर आदी भागांतही माहिती–तंत्रज्ञानाच्या क्षेत्राचा विस्तार झालेला आहे.सॉफ्टवेअर निर्यातीच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात कर्नाटकनंतर दुसरा क्रमांक आहे. भारतात सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कची रचना माहिती–तंत्रज्ञान खात्याने केली असून माहिती–तंत्रज्ञान व संदेशवहन मंत्रालयांतर्गत याचे कार्य १९९१ पासून चालते. सॉफ्टवेअरची निर्यात करणे, रोजगार देणे, संगणक पुरवठा करणे हा याचा उद्देश आहे. भारतातील सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस् महाराष्ट्रात १९९० मध्ये सुरू करण्यात आला. आज महाराष्ट्र अशा पार्कअंतर्गत सॉफ्टवेअरची निर्यात करणारे देशातील दुसरे राज्य आहे. २००८ हे वर्ष महाराष्ट्राने 'माहिती–तंत्रज्ञान वर्ष' म्हणून साजरे केले होते. महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये माहिती–तंत्रज्ञान धोरणाला मंजुरी दिली. डॉ. विजय भाटकर यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञांच्या समितीने केलेल्या शिफारशींनुसार हे धोरण निश्चित करण्यात आले. गेल्या काही वर्षांत राज्याच्या शासन–प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. ई गव्हर्नन्समुळे नागरिकांना अनेक कामांसाठी सरकार दरबारी हेलपाटे घालण्याच्या जाचातून मुक्तता मिळत आहे. आज मोबाईल आणि इंटरनेट वापरामध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्रात स्मार्टफोन वापरणा–यांचे दर हजारी प्रमाण देशातील सर्वाधिक आहे.महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणा–या कृषी क्षेत्रातही गेल्या ५०–६० वर्षांत तंत्रज्ञानाचा वापर वाढत गेल्याचे दिसते. आज राज्यातील शेतक–यांना मोबाईल फोनवर हवामानाच्या अंदाजांपासून ते बाजारभावांपर्यंतची सर्व माहिती क्षणार्धात मिळते तसेच शासनाच्या विविध योजनांविषयीचे तपशीलही शेतक–यांना मोबाईलवर मिळत असतात. दुसरीकडे, प्रत्यक्ष शेतीतही तंत्रज्ञानाचा वापर पूर्वीच्या तुलनेत कमालीचा वाढत गेला आहे. याचा फायदा श्रम, वेळ आणि खर्च यांची बचत होण्यात झाला असून त्यातून शेतक–यांना लाभच होत आहे. कृषी क्षेत्राबरोबरच शिक्षण, आरोग्य, बँकिंग, न्यायप्रणाली अशा सर्वच क्षेत्रांत देशभरात तंत्रज्ञानाने जी प्रगती साधली त्यामध्ये महाराष्ट्र मागे राहिलेला नाही.माहिती तंत्रज्ञानाचा उत्तम उपयोग ४ वर्षांपूर्वीच्या लॉकडाऊनच्या काळातही झाला. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील स्वयंसहायता गटातील १० हजारांपेक्षा जास्त जणांनी राज्य आणि केंद्र शासनाच्या महिलांसाठीच्या योजनांबाबत ऑनलाईन प्रशिक्षण



घेतले. ही किमया महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियानने केली. विशेष म्हणजे असे प्रशिक्षण देणारे देशातील महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. आज जगभरातील बहुराष्ट्रीय संगणक उद्योग भारतातील आऊटसोर्सिंग क्षेत्रातील तेजीचा फायदा घेण्यासाठी सरसावत आहेत. त्याचप्रमाणे अनेक कंपन्या त्यांचे सॉफ्टवेअर संशोधनाचे काम भारतीय उद्योगांना आउटसोर्स करीत आहेत तर बाकीच्या भारतात त्यांचे अस्तित्व निर्माण करीत आहेत आणि सॉफ्टवेअर निर्यातीमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील अनेक टेक्नो कंपन्यांचा समावेश आहे. जसजशी माहिती तंत्रज्ञान उद्योगाला प्रगल्भता येत आहे तसतशी राज्याला उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी नवी आणि कल्पक दिशा सापडते आहे. माहिती तंत्रज्ञान व त्यावर आधारित सेवा व उद्योगांमधील निर्यातीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात दुस–या स्थानी आहे तर महाराष्ट्रात पुणे प्रथम क्रमांकावर आहे. कोरोनाचा व लॉकडाऊनचा आयटी व आयटी आधारित सेवा उद्योगांवर फारसा प्रभाव पडला नाही. पुणे विभागांतर्गत सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाच्या पुणे विभागातील ९२७ संस्थांकडून लॉकडाऊनच्या २ महिन्यांच्या काळात १८ हजार कोटी रुपयांची निर्यात करण्यात आली होती. सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कची स्थापना झाल्यानंतर १९९१ रोजी या तिन्हीचे एकत्रीकरण करीत सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाची (एसटीपीआय) स्थापना करण्यात आली. एसटीपीआयच्या पुणे विभागांतर्गत २०१८–१९ मध्ये ८७९ युनिट्सच्या माध्यमातून ८५ हजार १६३ कोटी रुपयांची निर्यात नोंदली गेली होती तर त्या वर्षात या विभागांतर्गत येणा–या युनिट्समध्ये साडेचार लाख कर्मचारी कार्यरत होते. सन २०१९–२० मधील अंदाजित निर्यात सुमारे ९३ हजार कोटी रुपयांहून अधिक होती. आयटी, आयटीईएस क्षेत्राचा विकास वेगाने होत राहील व लवकरच पुणे विभागातील निर्यात एक लाख कोटी रुपयांचा टप्पा गाठण्याची शक्यता आहे. देशाच्या एकूण आय. टी. उलाढालीत महाराष्ट्राचा वाटा मोलाचा असला तरी आय. टी. उद्योग विस्ताराच्या बाबतीत भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्रात बरीच विषमता आहे त्यामुळे येणा–या काळात मुंबई–पुणे प्रमाणेच नागपूर, सांगली, कोल्हापूर नाशिक ही शहरे संगणक प्रणाली केंद्रे म्हणून विकसित करण्याची गरज आहे. वीज, रस्ते, सार्वजनिक दळण–वळणाची साधने, विमानतळ यासारख्या सुविधा राज्यातल्या या प्रमुख शहरांत आधुनिक रुपात विकसित करण्याची गरज आहे.माहिती–तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुरेसे कुशल मनुष्यबळ पुरवण्यासाठी नॅसकॉमने लघु, मध्यम आणि लांब पल्ल्याच्या योजना सुचवल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कुशल तंत्रज्ञांच्या कार्यक्षमतेत वाढ कशी करता येईल त्याचे प्रयोजन करणे, आय. टी. उद्योगाचा विस्तार मध्यम किंवा लहान शहरात वाढवणे आणि त्या योगे खर्चात बचत होईल, अशा काही योजनांवर तातडीने भर देण्याची गरज आहे. मध्यम पल्ल्याच्या योजनांचा भर, कुशल तंत्रज्ञ तयार करण्यासाठी लागणारा प्रशिक्षण कालावधी कमी कसा करता येईल तसेच अशा कुशल तंत्रज्ञांची माहिती एकत्र कशी करता येईल यावर आहे. थोडक्यात, महाराष्ट्रात आज माहिती तंत्रज्ञानात जे मनुष्यबळ आहे त्याची उत्पादकता वाढवण्यावर भर दिला पाहिजे.महाराष्ट्रात स्टार्ट अप योजनांना चांगला प्रतिसाद मिळत असून आता अधिकाधिक युवा वर्ग स्टार्ट अपकडे वळत आहे. २०१९ मध्ये देशात नोंदणी करण्यात आलेल्या एकूण २१ हजार ५४८ स्टार्ट अपपैकी ८,४०२ म्हणजेच सर्वाधिक स्टार्ट अप्सची नोंदणी महाराष्ट्रात झाली होती. २०२४ मध्ये हा आकडा वाढून २२ हजारांच्या पुढे गेला आहे. राज्यातील संसाधनाचा उपयोग करण्यासाठी स्टार्ट अप काम करीत आहेत. गतवर्षी महाराष्ट्राला माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला भरारी घेण्यासाठी राज्य सरकारकडून प्रोत्साहनपर नव्या घोषणांसह राज्यात ९५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणारे नवे धोरण स्वीकारण्यात आले आहे. यामुळे राज्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्तारासोबतच मुंबईसह आता ठाणे आणि नवी मुंबईतही आयटी क्षेत्राचा विस्तार होण्यास मदत होणार आहे. या धोरणांतर्गत राज्यात ३.५ दशलक्ष रोजगारनिर्मिती आणि १० लक्ष कोटी एवढी निर्यात करण्याचे राज्य सरकारचे उद्दिष्ट आहे.

# भूमिपुत्राला लोकसभेत पाठवण्याच्या संधीचे सोने करूया

## आमदार धिरज देशमुख यांचे आवाहन; निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु) आणि हलगरा येथे जाहीर सभा संपन्न



निलंगा : काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे निलंगा विधानसभा मतदारसंघातील भूमिपुत्र आहेत. त्यांना लोकसभेत पाठवण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. या संधीचे आपण सर्वांनी सोने करण्यासाठी डॉ. काळगे यांना या भागातून मोठे मताधिक्य देण्याचा निर्धार करूया, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी येथे केले. निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु) आणि हलगरा येथे लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ सोमवारी (ता. २९) आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील-निलंगेकर, अभय साळुंके, डॉ अरविंद भातांब्रे, संतोष देशमुख, दत्ता बेंडले, अजित माने, आमीन शेख, लिंबन अप्पा रेशमे, सरस्वती शिंदे, पंकज शेळके, सुधीर मसलगे, समीयोद्दीन देशमुख, देवदत्त पाटील, रमेश मदरसे, शेषराव दोळे, आशुतोष मसलगे, संतोष गंगथडे, अविनाश रेशमे, महेश देशमुख, सुधाकर पाटील, चक्रधर शेळके, शकील पटेल, प्रमोद कदम, दयानंद चोपणे, हमीद शेख, विठ्ठल पाटील, अजित नाईकवाडे, दिनकर बिराजदार, नारायण सोमवंशी, बालाजी गोमसाळे, अमोल सोनकांबळे, गोविंद सूर्यवंशी, सुभाष शिंदे, महावीर काकडे, जगदीश सगर, गुंडेराव बिराजदार उपस्थित होते.आमदार धिरज देशमुख म्हणाले, स्वामिनाथन आयोगाच्या सूत्रानुसार शेतमालाला कायदेशीर हमीभाव, शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतीची 'जीएसटी'मधून मुक्ती, तरुणांना एक लाख रुपयांचे विद्यावेतन, महिलांना दरवर्षी एक लाख रुपये... यासह अनेक घोषणा काँग्रेस पक्षाने आपल्या न्यायपत्रात केल्या आहेत. काँग्रेसचा २५ कलमी कार्यक्रम देशाला नवी कलाटणी देणारा आहे. त्यामुळे आपण सर्वांनी काँग्रेस, महाविकास आघाडीला मतदान करून डॉ. काळगे यांना बहुमतांनी विजयी करावे.भारतीयांवर संकटे लादणाऱ्या सरकारला आता बाजूला करा अशोकराव पाटील-निलंगेकर म्हणाले, स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने देश एकसंध ठेवला. देशाची सुरक्षा करीत भारताच्या विकासाचा पाया रचला. देशात विविधता असूनही आपण एकत्रित, गुण्यागोविंदाने राहतो. पण, भाजपला हे पाहवत नाही. लोकांमध्ये भांडणे लावून त्यांना आपली झोळी भरायची आहे. आज प्रत्येक भारतीय दरडोई भरमसाठ जीएसटी भरतो. अशी अनेक संकटे त्यांनी भारतीयांवर लादली आहेत. अशा सरकारला आता बाजूला करा.यावेळी अभय साळुंके, लिंबन रेशमे, अजित माने, अविनाश रेशमे, अरविंद भातांब्रे यांनी डॉ. शिवाजी काळगे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन ग्रामस्थांना केले.

# औरंगाबाद मतदारसंघात ३७ उमेदवार रिंगणात

छत्रपती संभाजीनगर : औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात बहुरंगी निवडणूक होणार आहे. सोमवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ७ उमेदवारांनी मैदानातून माघार घेतली. छाननीअंती ४४ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व उमेदवारांना चिन्हांचे वाटप केल्यानंतर निवडणूक मैदानात 'नोटा'सह ३८ उमेदवार रिंगणात असतील, असे नमूद केले.पत्रकारांशी बोलताना स्वामी यांनी सांगितले, उमेदवारांची संख्या पाहता तीन ईव्हीएम प्रत्येक मतदान केंद्रावर लागणार असून, प्रशासनाने तयारी केली आहे. दुपारी २:४५ वाजता शेवटचा उमेदवार अर्ज मागे घेण्यासाठी आला. जबरदस्तीचा प्रकार कुठेही घडला नाही. स्वत: उमेदवार माघार घेण्यासाठी आले होते.राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांचे राखीव असलेले चिन्ह त्यांना देण्यात आले. नोंदणीकृत पक्षांना त्यांचे चिन्ह दिले. काही उमेदवारांना सोडत काढून चिन्ह देण्यात आले. दरम्यान, 'नोट'सह ३८ उमेदवार रिंगणात असल्यामुळे प्रशासनाचे टेन्शन वाढले आहे. शिंदेसेना, उद्धवसेना आणि एमआयएम प्रामुख्याने हीच लढत असणार आहे. २०१९च्या निवडणुकीत 'नोट'सह २४ उमेदवार मैदानात होते. दररोज १ लाख ७० हजार मतदारांपर्यंत जावे लागणार ११ मेरोजी सायंकाळी ५ वाजता प्रचार तोफा थंडावतील. ३० एप्रिलपासून १२



दिवस प्रचारासाठी उरले आहेत. मैदानात असलेल्या उमेदवारांना रोज किमान १ लाख ७० हजार मतदारांपर्यंत पोहोचावे लागेल. कोणत्या चिन्हासाठी लागली स्पर्धा ऑटो रिक्षा, कपाट, रोड रोलर या चिन्हांसाठी सर्वाधिक मागणी होती. सोडतीला लहानगा न भेटल्यामुळे मीच डोळे बंद करून चिन्हाची चिठ्ठी काढली. तुतारी हे चिन्ह देखील उमेदवाराला देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी स्वामी यांनी नमूद केले.निकाल उशिरा लागणार १३ मेरोजी मतदान झाल्यानंतर ४ जूनला निवडणुकीचा निकाल लागणार आहे.

# रोज एक-दोन लवंग चघळल्या तर शरीरावर काय परिणाम होईल? तज्ज्ञांकडून जाणून घ्या उत्तर

सामान्यतः भारतीय स्वयंपाकात सुगंधी मसाला म्हणून वापरली जाणारी लवंग ही त्यांच्या अँटिऑक्सिडंट आणि प्रतिजैविक गुणधर्मांसाठी ओळखली जाते. परिणामी, लवंग आपल्या आरोग्यासाठी अनेक फायदे देते आणि नियमितपणे सेवन करण्याची शिफारस केली जाते.ब्रिटीश भारतीय वैद्यकीय व्यावसायिक डॉ. रुपी औजला यांनी इन्स्टाग्रामवर त्यांच्या फॉलोअर्सला रोज लवंग चघळण्याचे फायदे सांगितले आहेत. एका रीलमध्ये त्यांनी दररोज लवंग चघळण्याच्या अनेक फायद्यांचा उल्लेख केला आहे, ज्यात जळजळ प्रभावीपणे बरे करण्याची क्षमता, रक्तदाब कमी करणे आणि तोंडाचे आरोग्य राखणे या फायद्यांचा समावेश आहे.लवंगा चघळण्याचे आरोग्य फायदे डॉ. औजला यांच्याशी सहमती दर्शवत आसरा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. जगदीश जे. हिरेमठ यांनी द इंडियन एक्स्प्रेसला सांगितले की, लवंग ही युजेनॉलने समृद्ध आहे, हे एक शक्तिशाली प्रतिजैविक घटक आहे, जे हिरड्यांना आलेली सूज आणि पीरियडॉन्टायटिस सारख्या रोगांसाठी जबाबदार तोंडांतील रोगकारकांशी लढण्यास मदत करते.डॉ. हिरेमठ सांगतात की, अभ्यासांमध्ये असे सुचवले आहे की, युजेनॉल जीवाणू, बुरशी आणि विषाणूंविरूद्ध प्रभावी आहे, जे मौखिक स्वच्छता आणि आरोग्य सुधारण्यात त्याची भूमिका अधोरेखित करते.प्रतिजैविक गुणधर्मांच्या पलीकडे लवंग त्यांच्या उच्च अँटिऑक्सिडेंट घटकांसाठी ओळखली जाते. लवंगमधील अँटिऑक्सिडंट्स, जसे की फ्लेव्होनॉइड्स आणि आयसोफ्लाव्होन,



फ्री रॅडिकल्सला तटस्थ करण्यात मदत करतात, ज्यामुळे सेल्युलर नुकसान टाळता येते आणि हृदयरोग आणि कर्करोग यांसारख्या दीर्घकालीन आजारांचा धोका कमी होतो, असे डॉ. हिरेमठ सांगतात.त्यांनी सांगितले की, लवंगाचे दाहक-विरोधी प्रभाव हा इंफ्लेमेटरी साइटोकिन्स आणि एन्झाईम्सच्या प्रतिबंधाद्वारे मध्यस्थी करतात, ज्यामुळे संपूर्ण शरीरात जळजळ कमी होऊ शकते. संधिवात आणि इतर दाहक विकारांसारख्या परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी हे विशेषतः फायदेशीर आहे.दातदुखी कमी करण्यासाठी आणि हिरड्यांचे आजार हाताळण्यासाठी लवंग ठरते प्रभावी डॉ. हिरेमठ यांच्या मते लवंग चघळल्याने खालील प्रकारे दातदुखी आणि हिरड्यांचे आजार कमी होण्यास मदत होते:वेदनाशामक गुणधर्म : लवंगामध्ये आढळणारे युजेनॉल हे केवळ प्रतिजैविक घटक नसून नैसर्गिक वेदनाशामक आणि भूल देणारे औषधदेखील आहे, जे सामान्यतः दातदुखीच्या तात्पुरत्या आरामासाठी दातांची काळजी घेण्यासाठी वापरले जाते. दातांच्या वेदना कमी करण्यासाठी लवंग प्रभावी आहे, याचा उल्लेख दंत साहित्यात केला जातो. हिरड्यांचे आरोग्य : जळजळ आणि बॅक्टेरियाची वाढ कमी करून, लवंग निरोगी हिरड्या निर्माण करण्यात योगदान देऊ शकते, हिरड्यांच्या आजारांच्या वाढीस प्रतिबंध किंवा मंद करू शकते. लवंग आधारित माउथवॉश किंवा तेलांचा नियमित वापर मौखिक आरोग्य राखण्यासाठी विशेषतः प्रभावी ठरू शकतो.लवंग आणि पाचक आरोग्य डॉ. औजला इष्टतम पाचक आरोग्यासाठी लवंग चघळण्याच्या महत्त्वावर भर देतात. डॉ. हिरेमठ लवंगमध्ये असे कोणते घटक आहे, जे पाचक आरोग्यासाठी मदत करतात याबाबत सांगतात.पाचक एन्झाईम्सचा स्राव उत्तेजित होणे : लवंग पाचक एन्झाईम्सचा स्राव उत्तेजित करते, ज्यामुळे पचन सुधारते आणि सूज येणे, गॅस आणि अपचन यांसारख्या जठरासंबंधित त्रासाची लक्षणे कमी करते.अन्ननलिकेवर दाहकविरोधी प्रभाव : लवंगमधील दाहकविरोधी गुणधर्म अन्ननलिकेच्या अस्तराला शांत करते आणि जळजळसंबंधित पाचन समस्या कमी करतात.लवंगांच्या वारंवार सेवनामुळे होणारे धोके लवंगांमधील युजेनॉल फायदेशीर असले तरी डॉ. हिरेमठ चेतावणी देतात की, जास्त प्रमाणात लवंग सेवन केल्याने यकृताचे नुकसान होऊ शकते, विशेषत: आधीपासून यकृत संबंधी समस्या असलेल्या व्यक्तींना त्यामुळे त्रास होऊ शकतो. युजेनॉलसाठी उपचारात्मक निर्देशांक (प्रभावी डोस आणि हानिकारक डोस यांच्यातील श्रेणी) मर्यादित आहे आणि सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला जातो.लवंग त्यांच्या रक्त पातळ करण्याच्या गुणधर्मामुळे (रक्त गोठण्याची क्रिया थांबवणारे द्रव्य) औषधांशीदेखील प्रक्रिया साधू शकते. अशी औषधे घेत असलेल्या रुग्णांनी त्यांच्या आहारात लवंगांचा समावेश करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे डॉ. हिरेमठ ठामपणे सांगतात.दैनंदिन आहारात लवंग समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे रोज एक ते दोन लवंग अशा थोड्या प्रमाणात वापरणे फायदेशीर ठरू शकते, असे डॉ. हिरेमठ सांगतात. आरोग्याच्या फायद्यासाठी लवंग ही चहा, भाजलेल्या पदार्थांमध्ये किंवा आहारामध्ये वापरू शकता.गर्भवती स्त्रिया, यकृताचा आजार असलेल्या व्यक्ती आणि रक्त पातळ करणारी औषधे घेत असलेल्यांनी लवंग सावधपणे आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार वापरावी. संभाव्य प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी मुलांनीही पालकांच्या देखरेखीखाली लवंग वापरावी.


# काँग्रेस नेते नसीम खान यांच्या मनधरणीचे प्रयत्न

मुंबई : मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघाच्या काँग्रेस उमेदवार वर्षा गायकवाड यांच्या उमेदवारीमुळे नाराज झालेले काँग्रेस नेते नसीम खान यांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरू आहेत. पक्षाच्या हायकमांडच्या सूचनेनंतर मुंबईतील काँग्रेस नेत्यांनी सोमवारी खान यांची भेट घेत त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला.सोमवारी गायकवाड यांनी माजी खासदार प्रिया दत्त यांची भेट घेत चर्चा केली. तर, दुसरीकडे गायकवाडांच्या उमेदवारीने नाराज झालेल्या नसीम खान यांची खासदार चंद्रकांत हंडोरे, आमदार भाई जगताप, माजी मंत्री सुरेश शेट्टी, अमरजीत मनहास यांनी भेट घेतली. या भेटीवरून उलटसुलट चर्चा रंगल्या. मात्र, ही भेट नाराजी दूर करण्यासाठी होती. पक्षातील हायकमाडने दिलेल्या सूचनेनुसार या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती काँग्रेसमधील सूत्रांनी दिली आहे.मुळात या मतदारसंघातून उमेदवारीसाठी भाई जगताप, सुरेश शेट्टी यांची नावे चर्चेत होती. मात्र, आता उमेदवारी जाहीर झाल्यानंतर एकदिलाने काम करण्याच्या सूचना पक्षाने दिल्या आहेत. तसेच हायकमांडने खान यांची नाराजी दूर करण्यासाठी चर्चा करण्याच्या सूचना दिल्यानंतर मुंबईतील नेत्यांनी आज बैठक केली. विशेष म्हणजे स्वतः वर्षा गायकवाड यांनीही काही दिवसांपूर्वी नसीम खान यांची भेट घेत चर्चा केली होती. दरम्यान, या भेटीसंदर्भात काँग्रेस नेते भाई जगताप म्हणाले की, नसीम खान हे काँग्रेसचे बडे नेते आहेत. अल्पसंख्याकांचे एक खंबीर नेतृत्त्व आहे. प्रचारात त्यांचा सक्रीय सहभाग आवश्यक असल्याने त्यांची भेट घेतली. त्यांची नाराजी आम्ही हायकमांडला कळविली आहे.संभाजी ब्रिगेडचा वर्षा गायकवाड यांना पाठिंबा उत्तर मध्य मुंबईतील काँग्रेस उमेदवार वर्षा गायकवाड यांना संभाजी ब्रिगेडने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. संभाजी ब्रिगेडच्या मुंबईतील पदाधिकाऱ्यांनी गायकवाड यांची भेट घेऊन हा पाठिंबा जाहीर केला.



# स्तनपान आणि वजन, खरंच काही संबंध असतो का?

आपल्या बाळासाठी जे योग्य आहे, ते करण्याचा प्रत्येक मातेचा आग्रह असतो. नवमातेने 'अमुक अमुक' नक्की खायलाच हवं, हा इतरांचा अनुभवी आग्रहदेखील असतो. खाण्या -पिण्याचे सल्ले देऊ करणाऱ्यांकडे अनेकदा ब्रेस्टफीडिंग म्हणजे स्तनपान याबाबत पुरेशी माहिती नसते, किंबहुना 'ते आपोआप उमजतं' असा एक सर्वमान्य समज आहे . स्तनपान करताना खाण्याचं पथ्य , नवमातेला येणार थकवा , बाळाच्या वेळेनुसार बदलणार वेळेचं गणित याचा कुटुंबाच्या मानसिक स्वास्थ्यवर देखील परिणाम होत असतो. आजचा लेख याच नवमातांसाठी विशेष !ब्रेस्टफीडिंगच टेन्शन मला ब्रेस्टफीडिंगच टेन्शन आलंय प्रिया सांगत होती. ३ आठवड्यात प्रियाचं बाळ या जगात येणार होतं आणि त्याबद्दल अर्थात तिचं गुगल सर्चिंग सुरु होतं .ब्रेस्टफीडिंग मुळे वाढलेले वजन आणखी वाढेल का? प्रिया बाळ झालं की, हे वजन कमी होईलच पण ब्रेस्टफीडिंग मुळे वजन वाढणार नाही. उलट तू जास्त हेल्दी होशील. म्हणजे जास्त कॅलरीज खाऊन अजून लठ्ठ ? प्रियाने कसनुसं तोंड करत विचारलं. वजनाची चिंता तसं नाही गं. पहिल्यांदा तू वजनाची चिंता करू नको. तुझं वजन आताही उत्तम आहे. ब्रेस्टफीडिंग करताना जास्त कॅलरीज खाऊन वजन नाही वाढणार, उलट तुझी रोगप्रतिकारशक्ती वाढेल आणि हळूहळू शरीर पूर्वपदावर येईल. हॉर्मोन्स फॅक्शनिंगची सिम्फनी तयार होईल यावर प्रिया म्हणाली म्हणजे पोस्ट प्रेगन्सी विस्डम आणि हेल्थ बोनस म्हणायचं यावर आम्ही सगळेच हसलो . गर्भारपणात स्त्रियांचे वजन वाढते. ताईच प्रसूतीनंतर ते कमीदेखील होते. बाळाच्या सकस आहारासाठी आणि नवमातेच्या स्वास्थ्यासाठीदेखील ब्रेस्टफीडिंग म्हणजेच स्तनपान अत्यंत महत्वाचे आहे.स्तनपानासाठी लागतात अधिक कॅलरीज स्तनपान जितके बाळासाठी आवश्यक आहे तितकेच नवमातांच्या आरोग्यासाठी देखील आवश्यक आहे. स्तनपान करणाऱ्या मातेचे अनेक रोगांपासून रक्षण होते. विविध प्रकारच्या कर्करोगापासून मातेचे संरक्षण करणे, हृदयरोगापासून रक्षण करणे, मधुमेह आणि उच्चरक्तदाब कमी करणे यासारखे उत्तम परिणाम त्यामुळे मिळतात. त्यामुळे बाळ झाल्यानंतर स्तनपान किमान ६-८ महिने जरूर करावं आणि या दरम्यान संतुलित आहार घ्यावा. याच दरम्यान अनेक स्त्रिया मात्र वाढलेल्या वजनाची चिंता बाळगत राहतात. परिणामी अचानक जेवण कमी करणे, फॅट्स न खाणे असे अघोरी नियम अमलात आणतात. यामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ्य



बिघडतेच शिवाय बाळाच्या पोषणावरदेखील परिणाम होतो. कोणत्याही प्रकारचे कमी-कॅलरीचे आहार नियमन करण्यापूर्वी नवमातेला स्तनपान करताना ३००-५०० कॅलरीज इतक्या जास्तीच्या ऊर्जेची आवश्यकता असते, हे लक्षात घेणे महत्वाचे ठरते. कारण स्तनपानासाठी देखील मातेच्या कॅलरीज खर्च होतात. संप्रेरकांचे महत्त्व एखाद्या स्त्रीचा गर्भधारणेआधीचा आहार समजा १५००-१६०० कॅलरीज इतका असेल , गर्भवती असतानाच आहार २०००-२५०० कॅलरीज इतका असेल तर प्रसूती नंतर तो किमान १८००-२२०० कॅलरीज इतका असू शकतो.प्रसूतीनंतर शरीरात काही संप्रेरके परिणामकारकरीत्या काम करतात. या संप्रेरकांमुळे नवमातेचं शरीर (स्तनांचा आकार, पोटाचा आकार, शरीरावरील सूज कमी होणे इत्यादी), बाळाचं पोषण यावर परिणाम होत असतो. प्रसूतीनंतर शरीरातील संप्रेरकांचे संतुलन पूर्ववत व्हायला काही स्त्रियांमध्ये ८-१० आठवडे तर काही स्त्रियांमध्ये ६-८ महिने इतका वेळ लागू शकतो. याच संप्रेरकांची तोंडओळख करून घेऊ.ऑक्सिटोसिन स्तनपान करताना ऑक्सिटोसिन हे संप्रेरक स्तनातून दूध बाहेर पडण्यासाठी मदत करते. ६ ते ८ महिने बाळाला स्तनपान करणाऱ्या मातांमध्ये गर्भाशय लवकर पूर्ववत होऊ शकते. स्तनपान गर्भाशय आकुंचित करण्यासाठी मदत करते (ऑक्सिटोसिन हे या क्रियेतील महत्वाचे संप्रेरक आहे ) प्रोलॅक्टिन प्रोलॅक्टिन नवमातांमध्ये दूध तयार करणे आणि दुधात आवश्यक स्निग्धांशाचा मेळ राखण्यासाठीदेखील मदत करते.नवमातांमध्ये स्तनपानासाठी आवश्यक असणारे हे संप्रेरक वजन कमी करण्यासाठीदेखील कारणीभूत ठरते.इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन गर्भारपणात शरीरात इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टरोन यांचे प्रमाण वाढलेले असते. गर्भाच्या योग्य वाढीसाठी ही दोन्ही संप्रेरके अत्यावश्यक आहेत. गर्भवती महिलेच्या शरीरातील फॅट्सचे प्रमाण या दोन संप्रेरकांवर बहुतांशी अवलंबून असते. प्रसूतीनंतर यांचे प्रमाण कमी होते. अनेक महिलांमध्ये या संप्रेरकांचे अचानक कमी होणारे प्रमाण मानसिक अस्वास्थ्यासाठी कारणीभूत ठरू शकते.थायरॉईड आणि स्तनपान थायरॉईड ग्रंथी स्तनपान उत्तम व्हावे यासाठी कार्य करत असते. ज्या नवमातांमध्ये थायरॉईडचे असंतुलन आहे त्या योग्य उपचार घेऊन त्यांच्या नवजात अर्भकासाठी स्तनपान करू शकतात.घ्रेलिन, लेप्टीन आणि इन्सुलिन भुकेच्या संप्रेरकांपैकी महत्वाची असणारी घ्रेलिन आणि लेप्टीन ही संप्रेरके! अनेक संशोधनाअंती प्रसूतीनंतर घ्रेलिन आणि लेप्टीनचे बदलेले प्रमाण नवमातेच्या भूकेवर परिणाम करते, हे लक्षात आले आहे. अनेक नवमातांना भूल लागत नाही किंवा थोडेसे अन्न खाल्यावर एकदम पोट भरल्यासारखे वाटते. आहारातील सातत्याने असणारे साखरयुक्त पदार्थ (लाडू , खीर , मिठाई , पेढे इ.) शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण वाढवतात ज्यामुळे शरीराची चरबी साठवण्याची क्षमता देखील वाढते .कॉर्टिसॉल नवमातेला जर अतिमानसिक किंवा शारीरिक ताण असेल तर शरीरातील कॉर्टिसॉल या संप्रेरकांचे प्रमाण वाढते. ज्यामुळे कंबरेभोवतालची चरबी वाढते किंवा तशीच राहते. अपुरी झोप, अवेळी खाणे, सातत्याने तणावग्रस्त राहणे यामुळे नवमातांमध्ये कॉर्टिसॉल या संप्रेरकाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येते.बाळ झाल्यानंतर अपुरी झोप/ जागरण हे सगळ्याच नव्याने पालक झालेल्या दाम्पत्यांनी स्वीकारलेलं असतं. अशावेळी जीवनशैलीत योग्य बदल करून त्याप्रमाणे खाण्याचं पथ्य आणि दैनंदिन कामाचं स्वरूप बदलणं आवश्यक आहे. उदाहरणार्थ : रात्रीच्या वेळचं खाणं आणि पाणी पिणं यांचं वेळापत्रक बाळाच्या झोपेच्या वेळेप्रमाणे बदलणं. रात्रीच्या वेळी काहीही खाताना त्यात मैदा, साखर यांचं प्रमाण शून्य आहे याची काळजी घेणं. बाळ झाल्यानंतर कुटुंब म्हणून जीवनशैलीत एकत्रित केलेले बदल नवमातांचा मानसिक ताण आणि पोटावरील चरबीचे अनावश्यक प्रमाण कमी करण्यात महत्वाची भूमिका बजावतात, असे अनेक प्रसूतीतज्ज्ञांचे आणि स्त्रीरोग तज्ज्ञांचे मत आहे.बाळ झोपल्यावर झोपण्याचा प्रयत्न करा हा सल्ला कितीही हास्यास्पद वाटला तरी त्याचं पालन केल्यास अनेक नवमातांना शारीरिक ऊर्जा आणि विश्रांती यांच्या प्रमाणात विशेष फरक पडलेले दिसून येतात. ज्या स्त्रिया गर्भधारणा होण्याआधीपासून व्यायाम करतात त्यांना गर्भारपणादरम्यान आणि प्रसूतीनंतरदेखील उत्तम शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य लाभते . ताजा कलम: बाळाच्या जन्मांनंतर झोप तर नसतेच हे सामान्यपणे सगळ्याच नवमातांकडून ऐकिवात येते. अलीकडे नवजात अर्भकाच्या झोपेचं गणित सोपं करण्यासाठी गर्भारपणापासूनच त्यांच्यावर वेळेत झोपण्याचे संस्कार केले जाऊ शकतात हे सिद्ध झाले आहे. यामुळे अनेक नवमातांचे झोपेचे वेळापत्रक सुखकर होऊ शकते.

# कामाच्या जोरावर ओमराजे निवडुन येतील - दिलीपराव देशमुख यांना विश्वास

धाराशिव :- खासदार ओमराजे यांनी पाच वर्ष काम केले असुन त्याना जनता कामाच्या जोरावर निवडुन देईल असा विश्वास माजीमंत्री दिलीपराव देशमुख यानी व्यक्त केला. ते किल्लारी (ता.औसा) येथील प्रचारसभेत ते बोलत होते.

यावेळी श्री.देशमुख म्हणाले की, शिवसेनेमुळे भाजप राज्यात वाढली मोठी झाली. जेव्हा देशात त्यांचे बळ वाढले तस पहिला वार भाजपन याच शिवसेनेवर केला. भाजपची ही जुनी पध्दत असुन ज्याच्या बोटाला धरुन पक्ष उभा राहतो, ज्या शिढीवरुन ते वर चढतात पहिलाच वार त्याच लोकावर करतात हे आपल्याला शिवसेनेवर केलेल्या दगाबाजामुळे दिसुन आल्याचे श्री. देशमुख यानी सांगितले. फोडाफोडीच्या राजकारणात काही मोजके लोकप्रतिनिधी शिवसेनेत शिल्लक राहिले जे विकले गेले नाहीत त्यामध्ये आपले खासदार आहेत. खासदार ओमराजे यांनी गेल्या पाच वर्षात केलेल्या कामाच्या जीवावर ते उभा आहेत. ते घराणेशाहीने लादले गेलेले नाहीत. त्यामुळे कामाच्या जोरावर ओमराजे चांगल्या मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास त्यानी व्यक्त केला. देशात इंडीया आघाडीचे सरकार येणार आहे, त्या सरकारमध्ये शिवसेनेच्या





कोट्यातुन ओमराजे देशाच्या मंत्रीमंडळात असावे यासाठी देशमुख कुटुंब प्रयत्न करणार असल्याचे श्री.देशमुख यानी सांगितले.

श्री.देशमुख म्हणाले की, मोदी सरकार मुठभर उद्यगपतीना जगविण्याचे काम करत आहे, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मालाचे दर पाडण्याचे पाप देखील त्यानी केले आहे. सरकारचे दलाल या सगळ्या गोष्टी करुन बाहेरच्या देशातील माल आयात करण्यात येत असुन त्यामुळे देशातील शेतकऱ्यांचा माल कवडीमोल किंमतीमध्ये विकला जात आहे. या सरकारला आता शेतकऱ्यांनीही त्यांची शक्ती दाखवुन देत त्याना घरी बसविले पाहिजे असे अवाहन श्री. देशमुख यानी केले.

आज किल्लारी ता.औसा येथे उस्मानाबाद (धाराशिव) लोकसभा मतदार संघाची महाविकास आघाडीची प्रचार सभा मा.श्री दिलीपरावजी देशमुख साहेब (मा. मंत्री महाराष्ट्र राज्य), मा.श्री दिनकर माने साहेब ( मा. आ. तथा जिल्हाप्रमुख) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी श्रीशैल्य उटगे (काँग्रेस जिल्हाध्यक्ष), भरत (भाऊ) सुर्यवंशी ( जिल्हा अध्यक्ष रा. युवक कॉग्रेस), मा. संतोष सोमवंशी (सहसंपर्कप्रमुख) , मा. जयश्री ताई उटगे, मा. राजेंद्र मोरे (शेतकरी संघटक लातूर/ धाराशिव संपर्क प्रमुख), प्रज्ञा पाटील (मा. जि. प. सदस्य),मा. नारायण आबा लोखंडे (मा. जि. प. उपाध्यक्ष लातूर) मा. बजरंग दादा जाधव (उपजिल्हप्रमुख), मा. संतोष सुर्यवंशी, मा. दिनेश जावळे (जिल्हाप्रमुख), सौ. रेखा ताई पुजारी, मा. रामदास चव्हाण (मा.जि. प. सदस्य) मा. पुजा ताई सगर, मा. सुनिता भोसले, श्रीपतराव काकडे साहेब, मा. यत्तलेश्वर बावगे, सौ. बाबळसुरे (ताई) (सरपंच किल्लारी), मा. सचिन पाटील ( चेअरमन मारुती महाराज), मा. सुभाष (दाजी) पवार, मा. दत्तोपंत सुर्यवंशी (तालुका अध्यक्ष कॉग्रेस) मा. आबासाहेब पवार (तालुका प्रमुख) , मा. शामराव पाटील (तालुका अध्यक्ष कॉग्रेस) उपस्थित होते.

# लोकांनी एका चव्हाणला नाकारले दुस-याला स्वीकारले

नांदेड : प्रतिनिधी काँग्रेस सोडून भाजपात गेलेल्या खा. अशोकराव चव्हाण यांना आता लोकांनी नाकारले आहे. तर दुस-या चव्हाणांना स्वीकारले आहे, यामुळे लोकसभा निवडणुकीत आपला १ लाखांच्या लिडने विजय होईल असा दावा नांदेड लोकसभा उमेदवार वंसतराव चव्हाण यांनी केला. नवा मोंढा येथील काँग्रेस कार्यालय निवडणुकीनंतर मंगळवारी सकाळी आघाडीची पत्रकार परिषद झाली. यावेळी ते बोलत होते. परिषदेस माजी आ. ईश्वरराव भोसीकर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, शहराध्यक्ष अब्दुल सत्तार, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष डॉ. सुनिल कदम, उबाठाचे सहसंपर्क प्रमुख दत्ता कोकाटे, एकनाथ मोरे, भगवानराव आलेगावकर यांची उपस्थिती होती.पुढे बोलतांना वंसतराव चव्हाण म्हणाले की, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेस सोडल्यामुळे काही फरक पडणार नाही, हे मी पहिल्याच सभेत दंड थोपटून सांगीतले होते. काही पदाधिकारींनी भाजपात पलायन केले परंतू निवडणुकीत आघाडीतील पदाधिकारी, सर्वसामान्य लोक आमच्यासोबत होते. यामुळे १ लाखांच्या लिडने मी विजयी होईल. नांदेड सोबत राज्यात आघाडी ३२ ते ३५ जागा जिंकेल. येत्या ४ जून रोजी सर्व चित्र स्पष्ट होईल, तोपर्यत वाट पाहणे उचित ठरेल. लिड विषयी बोलतांना ते म्हणाले, माध्यमांचे गणित असते तसे आमचे गणित सुद्धा आहे.

# धर्माची शिकवण सदाचाराची असावी

## भिक्खू पय्यानंद थेरो

दर रविवार चलो बुद्ध विहार अभियान अंतर्गत, लातूर ग्रामीण भागातील वरवंटी बुद्ध विहार सम्राट अशोक नगर, वरवंटी ता. जि. लातूर येथे सामूहिक बुद्ध वंदना संपन्न.



लातूर :- मानवी समूहात धर्म हा अंत्यत पवित्र व श्रद्धास्थानी असलेला घटक असून समाजातील सर्वांगीण क्षेत्रात धर्म संस्थेचा प्रामुख्याने सहभाग असतो. तेंव्हा धर्माने समाजात प्रभावीपणे नीतिमत्ता, माणुसकी आणि चांगुलपणा यांचा प्रामुख्याने प्रचार करावा. याशिवाय प्रत्येक धर्माची शिकवण सदाचाराची असावी असे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले. दर रविवार, चलो बुद्ध विहार अभियान अंतर्गत वरवंटी येथील वरवंटी बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना संपन्न झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमाचे पुष्प आणि धुपाने वंदन करण्यात आले. त्रिरत्न वंदना, बावीस प्रतिज्ञा व सामूहिक संविधान प्रास्तविकेचे वाचन करण्यात आले. पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, मानवाची तांत्रिक क्षेत्रात प्रगती झाली आहे. परंतु वैचारिक, सांस्कृतिक क्षेत्रात मानसिक अज्ञान समाजात दिसून येत आहे. धर्माच्या नावाने कर्मकांड, अंधश्रद्धा, तात्विक व वैचारिक गोंधळ निर्माण केला जात आहे. त्यामुळे धर्माने या विषयी सावध भूमिका घेणे गरजेचे आहे. समाजात वैचारिक, तात्विक प्रबोधन करणे हे सर्व धर्माची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे धर्माने समाजातील अज्ञान नष्ट करून ज्ञान प्रसारित करणे काळाची गरज आहे. शिवाय समाज नीतिमन सदाचारी बनवण्याकरिता प्रत्येक धर्माने काम करावे असे वास्तविक चिंतन करावे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कमलाकर कांबळे, अमित कांबळे, अभिजित कांबळे, शुभम कांबळे, प्रदिप कांबळे, बाबासाहेब साबळे, सौरभ कांबळे, कृष्णा धावारे, अजय कसबे, नितीन साबळे, समाधान टेंकाळे, महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीचे उदय सोनवणे, ज्योतीराम लामतुरे, अन्तेश्वर थोटे, राहुल शाक्यमुनी, सतीश कांबळे, पांडुरंग अंबुलगेकर, शिवाजी सोनकांबळे, डॉ. अरुण कांबळे व वरवंटी येथील उपासक, उपासिका मोठया संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद धावारे यांनी केले, प्रास्ताविक तथा आभार अशोक कांबळे यांनी मानले.

# महाराष्ट्र अस्थिरोग दिवसानिमित्त आज हाडांच्या आजारावर शिबीर : डॉ.अशोक पोद्दार

लातूर : दि. १ मे हा दिवस महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटनेच्या वतीने महाराष्ट्र अस्थिरोग दिवस म्हणून साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटना व रोटरी क्लब ऑफ लातूरच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी हाडांच्या आजारावर मार्गदर्शन ,चर्चासत्र व अस्थिरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार यांनी दिली. महाराष्ट्र अस्थिरोग दिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक व आरोग्य विषयक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने अस्थिरोग तपासणी , फिजिओथेरपी, रक्त तपासणी, डिजिटल एक्सरे, एमआरआय, सिटी स्कॅन, हाडांच्या ठिसूळपणाच्या तपासणीवर २५ टक्के सूट देण्यात येणार आहे. यावर्षी संघटना सांधे वाचवा अभियान चालविणार आहे. त्यानिमित्त सायंकाळी ५ वाजता औषधी भवनच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांकरिता हाडांच्या आजारावर मार्गदर्शन व चर्चासत्रही होणार आहे. महाराष्ट्र अस्थिरोग दिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या चर्चासत्र व शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ऑर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ. संतोष माळी मी प्रेसिडेंट इलेक्ट डॉ. गिरीश कोरे, माजी अध्यक्ष डॉ. द्वारकादास तापडिया, उपाध्यक्ष डॉ. चेतन जाजू, डॉ. रणजीत हाके पाटील, सहसचिव डॉ. तुषार पिंपळे, डॉ. रोहन अकोसकर, कोषाध्यक्ष डॉ. मन्सूर भोसगे , डॉ.आशिष चलवदे, डॉ.शशिकांत कुकाले, डॉ. निलेश देशमुख, डॉ. विक्रम सूर्यवंशी, डॉ. किरण गोजमगुंडे, डॉ. श्रीनिवास संदीकर, डॉ. मधुसूदन बियाणी, डॉ. तुला उरगुंडे, डॉ. खालेद काझी, डॉ. हनुमानदास चांडक,डॉ. ऋषिकेश नळवदे, डॉ. इमरान कुरेशी, सन्घटनेचे उदगीरचे प्रतिनिधी डॉ. श्रीनिवास बलशेटवार ,डॉ.अजय महिंद्रकर, अहमदपूर प्रतिनिधी डॉ. वैभव रेड्डी, डॉ. सुनील चलवदे, निलंगा प्रतिनिधी डॉ. तात्यासाहेब देशमुख, अंबाजोगाई प्रतिनिधी डॉ. दीपक लामतुरे, डॉ. निलेश तोष्णीवाल, उमरगा प्रतिनिधी डॉ. राजकुमार कानडे, डॉ. सचिन विश्वेकर आदिंनी केले आहे.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी चे पुरस्काराचे थाटात वितरण

लातूर :- डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीच्या पुरस्काराचे राज्यस्तरीय वितरण दिनांक २८/ ४ /२०२४ रोजी थाटात वितरण करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष एडवोकेट एस एन बोडके व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ वासुदेवराव मुलाटे ज्येष्ठ साहित्यिक छत्रपती संभाजीनगर व डॉ दुष्यंत कटारे,प्राचार्य वेंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव हे होते कथा ,कविता ,कादंबरी ,बाल साहित्य ,आत्मचरित्र ,ऐतिहासिक ,या विभागातील प्रत्येकी प्रथम, द्वितीय, तृतीय ,पुरस्काराने सन्मानित करण्यात आले शाल ,हार, स्मृतिचिन्ह ,प्रमाणपत्र ,व रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले एकूण १८ साहित्यिकांचा गौरव यात करण्यात आला व एक देणगीदार घनश्याम गणपतराव दंडे यांनी संघास देणगी दिल्याबद्दल सत्कार करण्यात आला या सोबतच पुस्तकाचे परीक्षण करून दिल्याबद्दल याच कार्यक्रमात पाच परीक्षकांचाही सत्कार करण्यात आला सत्काराला



उत्तर व मनोगत म्हणून प्राथमिक स्वरूपात श्रीमती सुनंदा बोरकर जुलमे नागपूर व माननीय बाबा कोटंबे परभणी व गजआनन म्हात्रे ठाणे यांनी मनोगत व्यक्त केले माननीय डॉ दुष्यंत कटारे यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध भाषण केले अकादमीच्या कार्याचे कौतुक केले डॉक्टर वासुदेवराव मुलाटे सरांनी साहित्यिकांनी लिहित राहावं नवनवीन विषयाला हात घालावा व ज्वलंत प्रश्नावर लिहितव्हावं असा समाजासाठी संदेशदिला साहित्यिकाकडून मोठ्या अपेक्षा असतात हा संदेश दिला कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश घादगिने डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचे सचिव यांनी केले तर अध्यक्ष समारोपात एडवोकेट एस एन बोडके सरांनी साहित्यिकांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद कांबळे यांनी केले व आभार एडवोकेट अंगद गायकवाड यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता माधव गाडेकर प्रकाश घादगिने अडवोकेट अंगद गायकवाड संतोष गादेकर आदींनी परिश्रम घेतले

## 'इंडिया' ठरतोय 'एनडीए'ला लयभारी!

नवी दिल्ली/मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सर्व भाजप नेते प्रचारात गुंतले आहेत. दुसरीकडे भाजपाविरोधी इंडिया आघाडी आता आक्रमक होताना दिसत आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत जवाहरलाल नेहरूंनंतर सर्वाधिक काळ पंतप्रधान बनण्याची संधी मोदींकडे आहे. भाजपने अबकी बार ४०० पार यासाठी मेहनत घेतली आहे.परंतु पहिल्या २ टप्प्यातील मतदानानंतर भाजप जास्त आशावादी दिसत नाही. भाजपाने या निवडणुकीत ४३२ उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. अजूनही १० जागांवर निर्णय बाकी आहे. भाजपाला ३७० जागांचे बहुमत हवे असेल तर एकूण उमेदवारांपैकी ८६ टक्के उमेदवार विजयी होणे गरजेचे आहे.

# महाविकास आघाडीच्या उमेद्वाराला प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा लातूरातील बुध्दीवादी वर्गाचा निर्धार

लातूर - येथील हॉटेल अंजनी मध्ये ' ऋ-२४ 'च्या कार्यकर्त्याची व जिल्ह्यातील बुध्दीवादी विचारांच्या मान्यवरांची एक महत्वपूर्ण बैठक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी झालेल्या चर्चेत भाजपने देव आणि धर्माचा वापर करून भारताची सत्ता काबीज करून तब्बल १ज वर्षापासून भारतात जातीयता, धर्मांधता, द्वेष पसरवून संविधान मोडीत काढले आहे .सरकारी कारखाने आणि संसाधने विकून देशाला कंगाल बनविले आहे . एवढे करूनही पंतप्रधान मोदी विश्वगुरू झाल्याची अफवा पसरवीत आहेत. त्यांनी देशाच्या संविधानिक स्वायत्त संस्थाना बटीक बनवून त्यांचा गैरवापर केला आहे . त्यामुळे लोकशाही आणि संविधान धोक्यात आले आहे. अशा आणिबाणीच्या प्रसंगी समाजातील प्रबुध्द वर्गाचे मौन धोकादायक ठरू शकते. म्हणून या निवडणूकीत तटस्थता न बाळगता धर्मनिरपेक्ष तत्वाची जपणूक करण्यासाठी बुध्दीवादी वर्ग घराबाहेर पडून निवडणूक प्रक्रियेत सक्रीय झाला आहे. जाहिर पत्रके, पत्रकार परिषदा, कॉर्नर बैठका, पदयात्रा आणि जाहिर सभांचे आयोजन करण्याचे यावेळी निश्चीत झाले. या कार्यक्रमासाठी लागणारा खर्च






सर्व कार्यकर्त्यानी प्रत्येकी किमान १जजज/ -देऊन करण्याचे ठरले. बैठकीच्या सुरूवातीस यानिमीत्ताने काढलेल्या जाहिर पत्रकाचे माजी कुलगुरू जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या बैठकीमध्ये माजी न्यायाधिश आर. वाय.शेख, प्रा.अर्जुन जाधव, माधव बावगे, प्रा.शिवाजी शिंदे, श्रीहरी कांबळे, डॉ. असद खान, प्रा. रेड्डी , पी.जी.भीसे , प्रा.एम.बी. पठाण,ॲड. उगले, डॉ. गणेश गोमारे, कॉ. विठ्ठल भोसले, प्रा.सुभाष भिंगे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना प्रचारासाठी काही सूचना केल्या.

नरसिंग घोडके यांनी बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन केले तर माधव बावगे यांनी आभार मानले. या बैठकीस शहरातील परिवर्तनवादी विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट ब्राह्मण महासंघाच्यावतीने १० बटुंवर सामूहिक उपनयन संस्कार किनवट.ता.प्रतिनिधी.



(शेख शौकत) - अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्यावतीने सोमवारी दि.२९ किनवट शहरातील श्री.गजानन महाराज मंदिर सभागृहात आयोजित दुसऱ्या सामूहिक व्रतबंध सोहळ्यात विविध ठिकाणच्या १० बटुंवर उपनयन संस्कार करण्यात आले. किनवट ब्राह्मण महासंघाच्यावतीने गतवर्षीपासून सामूहिक व्रतबंध मेळावा घेण्यात येत आहे.यंदाच्या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील वे.शा.सं.दिनेशगुरु संभाजीनगरकर यांच्या मार्गदर्शनात व पवनगुरु बोराळकर,सार्थक पत्की,ऋषिकेश जोशी,बंडोपंत जोशी,विनोद कुलकर्णी यांच्या पौराहित्यात अल्केश प्रमोद पोहरकर,जयेश सुधाकर चाटोरे,अथर्व सुनील चांदुरकर(सर्व रा.किनवट),साई नितीन आलोने यवतमाळ,श्रवण,कार्तिक तिवरंगकर उमरखेड,तन्मय गणपत चाटोरे कुंटूर,श्रेयश श्यामराव पत्की मारेगाव,वरद दीपक लाठकर नांदेड व सार्थक विलास जोशी रा.बोथ तेलंगणा या १० बटुंवर उपनयन संस्कार करण्यात आले. प्रत्येक धर्मात संस्काराला महत्त्व आहे.उपनयन संस्कारामुळे बटुस खरे ब्राह्मणत्व प्राप्त होते. स्वधर्म आचरणासोबतच राष्ट्रधर्म आचरणासाठी अशा सामूहिक उपक्रमाची आवश्यकता आहे,असे मत दिनेशगुरु संभाजीनगरकर यांनी याप्रसंगी व्यक्त करून बटुंना आशीर्वाद दिले.यावेळी आमदार भीमराव केराम,माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान, व्यंकटराव नेम्मानीवार,के.मूर्ती,आनंद मच्छेवार,ज्येष्ठ नेते नारायणराव सिडाम,गंगन्ना नेम्मानीवार, दिनकरराव चाडावार,सुधाकर भोयर,व्यंकट भंडारवार,प्रवीण राठोड,अभय महाजन,फेरोज हिराणी,राजेंद्र चाडावार,श्रीनिवास नेम्मानीवार,शिवा आंधळे,गिरीश नेम्मानीवार,संतोष मरसकोल्हे आदींनी बटुंना शुभेच्छा दिल्या.सूत्रसंचालन नीलेश भिलवडीकर,विश्वास कोल्हारीकर,रवींद्र चौधरी यांनी केले.मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी ब्राह्मण महासंघाच्या पदाधिकारी,सदस्यांनी प्रयत्न केले.उपनयन संस्कारानंतर बटुंची श्री.हनुमान मंदिरापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE